पुणे महानगरपालिका
जाहिरात प्रकटन

समाज विकास विभागाकडील प्रशिक्षण केंद्रातील खालील अस्थायी पदांवर ०६ महिने मुदतीकरीता एकवट मानधन तत्वावर तसेच बॅच निहाय सेवा घ्यावयाची असल्याने अनुभवधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | एकूण पद संख्या | बॅचनिहाय मानधन रक्कम रूपये प्रतिमहा |
|---|---|---|---|
| १. | फोटोग्राफी, व्हीडीओ शुटींग व फोटो लॅमीनेशन, ॲडव्हान्स कोर्स-कलर फोटोग्राफी व कलर प्रोसेसिंग, डिजिटल फोटोग्राफी प्रशिक्षक | १ | र.रू.९,७५०/- |
| २. | वायरींग, मोटार रिवायडींग व विद्युत उपकरण दुरूस्ती प्रशिक्षक | १ | र.रू.९,७५०/- |
| ३. | फ्रिज एसी दुरूस्ती प्रशिक्षक | १ | र.रू.९,७५०/- |
| ४. | मोबाईल दुरूस्ती प्रशिक्षक | १ | र.रू.९,७५०/- |
| ५. | फॅशन डिझायनिंग प्रशिक्षक | ३ | र.रू.९,७५०/- |
| ६. | एम्ब्रॉयडरी प्रशिक्षक | १ | र.रू.९,७५०/- |
| ७. | ब्युटीपार्लर प्रशिक्षक | ३ | र.रू.९,७५०/- |
| ८. | दुचाकी वाहन प्रशिक्षक | १ | र.रू.९,७५०/- |
| ९. | दुचाकी वाहन दुरूस्ती प्रशिक्षण वर्ग सहाय्यक | १ | र.रू.६,०००/- |
| १० | चारचाकी वाहन दुरूस्ती प्रशिक्षक | १ | र.रू.९,७५०/- |
| ११ | चारचाकी वाहन दुरूस्ती प्रशिक्षण वर्ग सहाय्यक | १ | र.रू.६,०००/- |
| १२ | कॉम्प्युटर टायपिंग प्रशिक्षक | २ | र.रू.६,०००/- |
| १३ | इंग्रजी संभाषण कला प्रशिक्षक | ३ | र.रू.६,५००/- |
| १४ | जेन्टस् पार्लर (बेसीक व ॲडव्हान्स) प्रशिक्षक | १ | र.रू.९,७५०/- |
| १५ | संगणक हार्डवेअर, LINUX (REDHAT) प्रशिक्षक | २ | र.रू.९,७५०/- |
| १६ | संगणक बेसिक MS-CIT, TALLY, 9.0 ERA, DTP, CC++ प्रशिक्षक | ६ | र.रू.९,७५०/- |

<u>अटी:-</u>

१. वरील पदांवरील नेमणूका शैक्षणिक पात्रता, शासकीय व निमशासकीय विभागाकडे काम केल्याचा अनुभव व समाज विकास विभागाकडील (नागरवस्ती विकास योजना) कामाचा अनुभव इ. च्या आधारे परिक्षण करून व गुणानुक्रमे निवड व प्रतिक्षा यादी तयार करून सहा महिने मुदतीकरीता दरमहा एकवट मानधनावर तसेच बॅच निहाय करार पद्धतीने नेमणूक करण्यात येतील.

२. वरील अ.क्र.१ ते १६ या पदांकरिता वयोमर्यादा किमान १८ वर्षे व कमाल ५८ वर्षे पर्यंत अर्ज करू शकतील.

३. खालील तक्त्यात नमूद शैक्षणिक पात्रता धारण करणे व अनुभव असणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | हुद्दा | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|
| १. | फोटोग्राफी, व्हीडीओ शुटींग व फोटो लॅमीनेशन, ॲडव्हान्स कोर्स–कलर फोटोग्राफी व कलर प्रोसेसिंग, डिजिटल फोटोग्राफी प्रशिक्षक | एक वर्ष कालावधीचे विषयांकित शासनमान्य प्रशिक्षण उत्तीर्ण | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव |
| २. | वायरींग, मोटार रिवायडींग व विद्युत उपकरण दुरूस्ती प्रशिक्षक | एक वर्ष कालावधीचे विषयांकित शासनमान्य आय.टी.आय. उत्तीर्ण | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव |
| ३. | फ्रिज एसी दुरूस्ती प्रशिक्षक | विषयाकिंत डिप्लोमा/शासनमान्य आय.टी.आय. उत्तीर्ण | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव |
| ४. | मोबाईल दुरूस्ती प्रशिक्षक | डिप्लोमा (इलेक्ट्रॉनिक)/विषयांकित शासनमान्य प्रशिक्षण उत्तीर्ण/ एम.सी.व्ही.सी. | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव |
| ५. | फॅशन डिझायनिंग प्रशिक्षक | शिवणकामाचा शासनमान्य एक वर्षाचा प्रशिक्षण वर्ग पूर्ण | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव |
| ६. | एम्ब्रॉयडरी प्रशिक्षक | विषयाकिंत एक वर्षाचा प्रशिक्षण वर्ग पूर्ण | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव |
| ७. | ब्युटी पार्लर प्रशिक्षक | ब्युटीपार्लर एबीटीसी/सिडेस्को प्रशिक्षण उत्तीर्ण | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव |
| ८. | दुचाकी वाहन दुरूस्ती प्रशिक्षक | एक वर्ष कालावधीचे विषयांकित शासनमान्य आय टी आय उत्तीर्ण/ डिप्लोमा इन ऑटोमोबाईल इंजिनियरींग/ एन.सी.टी.व्हि.टी.उत्तीर्ण | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव |
| ९. | दुचाकी वाहन दुरूस्ती प्रशिक्षण वर्ग सहाय्यक | विषयांकित किमान सहा महिने कालावधीचे प्रशिक्षण उत्तीर्ण | विषयांकित कामाचा दोन वर्षांचा अनुभव |
| १०. | चारचाकी वाहन दुरूस्ती प्रशिक्षक | एक वर्ष कालावधीचे विषयांकित शासनमान्य आय टी आय उत्तीर्ण/ डिप्लोमा इन ऑटोमोबाईल इंजिनियरींग | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव |
| ११ | चारचाकी वाहन दुरूस्ती प्रशिक्षण वर्ग सहाय्यक | विषयांकित किमान सहा महिने कालावधीचे प्रशिक्षण उत्तीर्ण | विषयांकित कामाचा दोन वर्षांचा अनुभव |
| १२ | कॉम्प्युटर टायपिंग प्रशिक्षक | इ. १२ वी उत्तीर्ण व शासकिय टंकलेखन परीक्षा इंग्रजी ६० श.प्र.मि., मराठी ४० श.प्र.मि व हिंदी ४० श.प्र.मि. उत्तीर्ण, एमएससीआयटी उतीर्ण. | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव |
| १३ | इंग्रजी संभाषण कला प्रशिक्षक | बी.ए ( इंग्लिश) /एम.ए(इंग्लिश) | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव |
| १४ | जेन्टस् पार्लर (बेसीक व ॲडव्हान्स) प्रशिक्षक | ब्युटीपार्लर एबीटीसी/सिडेस्को प्रशिक्षण उत्तीर्ण | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव |
| १५ | संगणक हार्डवेअर, LINUX (REDHAT) प्रशिक्षक | बी.ई. (इलेक्ट्रॉनिक) | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव |
| १६ | संगणक बेसिक MS-CIT, TALLY, 9.0 ERA, DTP, CC++ प्रशिक्षक | बी.सी.ए /एम.सी.ए/ बी.सी.एस./ एम.सी.एस./एम.सी.एम/आय.टी. | विषय शिकविण्याचा दोन वर्षांचा अनुभव |

४. अर्ज करताना उमेदवारांची जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा जन्मतारखेची नोंद असलेली शालान्त परीक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची स्वयं–साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

५. अर्जदार महिला विवाहित असल्यास शासनमान्य विवाह नोंदणी प्रमाणपत्राची अथवा शासनमान्य गॅजेटची (राजपत्र) स्वयं–साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

६. अर्जासोबत एक पासपोर्ट आकाराचा फोटो, शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक पात्रतेचे दाखले, अनुभवाचा दाखला व इतर आवश्यक कागदपत्रे साक्षांकित करून व पानवारी (पेजींग) करून व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, शिवाजीनगर गावठाण, पुणे ०५ (दूरध्वनी क्र.०२० २५५३०५५०) या ठिकाणी अर्जदाराने स्वतः उपस्थित राहून दि. २४/१२/२०२४ ते ०२/०१/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी २.०० पर्यंत सादर करणेत यावा. टपालाने आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. उपरोक्त कागदपत्रांच्या मूळ प्रती निवड झालेल्या उमेदवारांनी रूजू होताना दाखविणे आवश्यक आहे. शासन निर्णयानुसार स्वयं- साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र सोबत कागदपत्रे साक्षांकित करून जोडणे आवश्यक आहे.

७. अर्जामध्ये संपूर्ण माहिती दिलेली नसल्यास तसेच अर्जासोबत उपरोक्त नमूद दाखल्याच्या प्रती जोडलेल्या नसल्यास सदरचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. अर्जासोबत दिलेली माहिती व मूळ कागदपत्रांत काही दोष आढळल्यास अशा नेमणूका बाद करण्यात येतील.

८. निवड झालेल्या उमदेवारांना विहीत नमुन्यात करारनामा करून फक्त ०६ महिन्यांकरीता नेमणूक दिली जाईल. त्यानंतर करार संपल्यानंतर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. त्याकरिता पुन्हा पत्रव्यवहार केला जाणार नाही. उमेदवार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा.

९. निवड झालेल्या उमेदवारास स्वखर्चाने करार करून द्यावा लागेल.

१०. निवड प्रक्रियेचे अंतिम अधिकार मा. अति. महापालिका आयुक्त (इ.), पुणे महानगरपालिका, पुणे यांनी राखून ठेवले आहेत.

११. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१२. सदर नियुक्त्या मानधन तत्वावर सहा महिने मुदतीकरीता होणार असल्याने निवड झालेल्या उमेदवारांना मनपाच्या आस्थापनेवरील कोणत्याही पदावर कायमस्वरूपी नियुक्तीकरीता हक्क सांगता येणार नाही. तसेच मनपा कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेले कोणतेही लाभ मिळण्यास ते पात्र ठरणार नाहीत.

१३. वरील पदासाठी कामाचे स्वरूप ठरविण्याचे अधिकार मा. खातेप्रमुख यांना राहील.

१४. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हताधारक करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी रद्दबातल केली जाईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१५. निवड झालेल्या उमेदवारास सेवेत रूजू होण्यापूर्वी एका महिन्याचे मानधन अनामत रक्कम म्हणून भरावे लागेल. त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

(नितीन उदास)
उप आयुक्त
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

| अ. | | इ. १२ वी | एम.एस.डब्ल्यु/पदवीधर/बी.ए (इंग्लिश) /एम.ए(इंग्लिश)/ बी.ई. (इलेक्ट्रॉनिक)/बी.सी.ए /एम.सी.ए/बी.सी.एस./ एम.सी.एस./एम.सी.एम | संबंधित विषयांचे शासनमान्य प्रशिक्षण/ शासनमान्य आय.टी.आय./डिप्लोमा/ डिप्लोमा (इलेक्ट्रॉनिक)/शिवणकामाचा शासनमान्य एक वर्षाचे प्रशिक्षण/ ब्युटीपार्लर एबीटीसी/सिडेस्को प्रशिक्षण/डिप्लोमा इन ऑटोमोबाईल इंजिनियरींग/ एन.सी.टी.व्हि.टी/किमान सहा महिने कालावधीचे प्रशिक्षण उत्तीर्ण/डिप्लोमा इन ऑटोमोबाईल इंजिनियरींग/आयटी |
|---|---|---|---|---|
| | गुण | ५ | १० | १० |
| | विशेष श्रेणी | ५ | १० | १० |
| | प्रथम श्रेणी | ४ | ८ | ८ |
| | द्वितीय श्रेणी | ३ | ६ | ६ |
| | उत्तीर्ण श्रेणी | २ | ४ | ४ |

---

| ब. | | समाज विकास विभागाकडे काम केल्याचा अनुभव | शासकीय व निमशासकीय विभागाकडे काम केल्याचा अनुभव |
|---|---|---|---|
| | गुण | १० | ५ |
| | ० ते १ वर्ष पर्यंत | ४ | २ |
| | १ वर्ष पुढील ते ५ वर्ष पर्यंत | ६ | ३ |
| | ५ वर्ष पुढील ते १० वर्ष पर्यंत | ८ | ४ |
| | १० वर्षाचे पुढे | १० | ५ |

| क. | कॉम्प्युटर टायपिंग प्रशिक्षक या पदाकरीता | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | तांत्रिक कौशल्य पात्रता – इंग्रजी टायपिंग ६० श.प्र.मि., मराठी ४० श.प्र.मि., हिंदी टायपिंग ४० श.प्र.मि. | | | | | संगणक कौशल्य पात्रता (एम.एस. सी.आय.टी.) |
| | | इंग्रजी ६० श.प्र.मि. | मराठी ४० श.प्र.मि. | हिंदी ४० श.प्र.मि. | | |
| | गुण | **5** | **5** | **5** | | **5** |
| | A - above 75% | 5 | 5 | 5 | | 5 |
| | B - 61 to 75% | 4 | 4 | 4 | | 4 |
| | C - 50 t0 60% | 3 | 3 | 3 | | 3 |
| | D - 40 t0 50% | 2 | 2 | 2 | | 2 |

(नितीन उदास)
**उप आयुक्त**
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

D:\Mandhan Sevakanchi Manytababat Prashikshan -2024 Final.doc